महाराष्ट्र शासन
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी खुर्द
तालुका – आंबेगाव जिल्हा पुणे ४१२४०५

दूरध्वनी क्र. : ०२१३३-२३०५८२ संकेतस्थळ: www.gcoeara.ac.in
ईमेल: office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शाअवसंमअ/ग्रंथालय/वर्तमानपत्र रद्दी/२०२४-२५/ 155 दिनांक: 08 JAN 2025

## निविदा सुचना

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,अवसरी खुर्द या संस्थेच्या ग्रंथालयातील रद्दी " आहे त्या स्थितीत" खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदा पद्धतीद्वारे विक्री करण्याचे ठरवले आहे. त्याकरीता इच्छुक खरेदीदाराकडून आपल्या जास्तीत-जास्त दराच्या निविदा या संस्थेत दिनांक १४.०१.२०२५ पर्यंत सादर कराव्यात.

### अटी व शर्ती यांचा तपशील खालीलप्रमाणे

१.इच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या सीलबंद निविदा या महाविद्यालयाचे आवक-जावक नोंदणी विभागात दि.१४.०१.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. संस्थेत उशीराने प्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२. उल्लेखित रद्दीची पाहणी दि.१४.०१.२०२५ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळ सकाळी ११.०० ते सायंकाळ ४.०० वाजेपर्यंत करता येईल.त्यासंबंधी जास्तीची माहिती आवश्यक असल्यास मा. ग्रंथालय प्रभारी अधिकारी / सहायक ग्रंथपाल यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.

३. प्राप्त निविदा संस्थेतील गठीत समितीद्वारे दि.१५.०१.२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता उघडण्यात येईल.

४. इच्छुक खरेदीदारांनी निविदा सोबत Firm चे Registration Copy, GST Registration Certificate व PAN Card च्या छायांकित प्रती सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा निविदा विचारात घेण्यात येणार नाही.

५. निविदा दस्तऐवजाच्या प्रत्येक पृष्ठावर इच्छुक खरेदीदाराची स्वाक्षरी केलेली असावी.अपूर्ण किंवा स्वाक्षरी नसलेल्या निविदा नाकारल्या जातील.

६.निविदा या कार्यालयास/महाविद्यालयास सादर केल्यानंतर त्यातील दरामध्ये फेरफार करता येणार नाही.

७. रद्दी वाहतूक खर्च हा निविदादाराला स्वतः करावा लागेल तो महाविद्यालयास देय असणार नाही.

८. ई-मेलद्वारे पाठवलेल्या निविदा निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

९.सर्वाधिक किमतीच्या निविदादारास विक्री आदेश संस्थेमार्फत दिला जाईल.सदर सर्व रद्दी स्वखर्चाने या संस्थेतून "आहे त्या स्थितीत" खरेदी करणे आवश्यक राहील.

१०. किमान बाजारभावाप्रमाणे किंवा त्यापेक्षा जास्त दराने किंमत न आल्यास विक्री प्रक्रिया रद्द करण्यात येईल.

११. विक्री केलेल्या रद्दीचे वजन संस्थेतील गठीत समिती समक्ष केले जाईल व त्यानुसार निवड केलेल्या खरेदीदराने त्वरीत कार्यालयात विक्रीची एकून रक्कम प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,अवसरी खुर्द यांचे नावे D.D./RTGS द्वारे भरावी. सदर विक्रीची एकून रक्कम प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,अवसरी खुर्द यांचे खात्यावर जमा झाल्यावर व तसे लेखा विभागाएकून भंगार विक्री रकमेची पावती ग्रंथालयास प्राप्त झाल्यावर संबंधित खरेदीदारास रद्दी संस्थेतून बाहेर नेण्याची परवानगी देण्यात येईल.

Rd 08-1-25

(डॉ.डी.आर.पानगव्हाणे)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी खुर्द